Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्री प्राकृत मधील गाथासप्तशती

**प्रा.बाळासाहेब गणपाटील**
विद्यावर्धिनी सभेचे डॉ. मा.य. वैद्य कला
प्रा. पी .डी.दलाल वाणिज्य आणि
डॉ. डी. एस .शहा विज्ञान महाविद्यालय धुळे
balasahebganpatil72@gmail.com

मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारा गाथासप्तशती हा महाराष्ट्री प्राकृत भाषेतीलच नव्हे तर सर्व भारतीय भाषेतील श्रेष्ठ ग्रंथ होय. सातवाहन साम्राज्य महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या हजारो वर्षाच्या इतिहासात चिरंतन भूषणास्पद असे साम्राज्य होऊन गेले. या साम्राज्याची अनेक वैशिष्ट्य आहेत, त्यांचे महत्त्व अनेक प्रकारे सांगता येते. भारताच्या इतिहासात विंध्य पर्वताच्या दक्षिणेस ही पहिलीच साम्राज्य सत्ता होती. सातवाहनाच्या काळात महाराष्ट्र सर्वच दृष्ट्या समृद्ध आणि विकसित पावलेला होता. सातवाहनांचा व्यापार रोम या युरोपमधील शहराबरोबर होता . सातवाहन वंश यांनी सर्व धर्मांना समान वागणूक आणि  उदार हस्ते दान दिले. त्यामुळे सर्व धर्मीयांच्या मनामध्ये या साम्राज्याविषयी आपुलकीची भावना वृद्धिंगत झाली. त्यांनी दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये विशिष्ट संस्कृती आणि इतिहासास प्रथमच प्रारंभ करून दिला.

या साम्राज्याचे डोळ्यात भरण्याजोगे आणखी एक महत्त्व असे की, इ.सन पूर्व235 ते इ. सन 250  अशी सुमारे 460 वर्षे या एकाच घराण्याने सत्ता अखंडपणे गाजविली.[1]  इतकी वर्षे सलग सातत्याने सत्ता चालविण्याचे उदाहरण जगाच्या इतिहासातही दुर्मिळच! सातवाहनांचेच शालिवाहन हे दुसरे नाव आहे. त्यांचे साम्राज्य आंध्र ,कलिंग पासून माळवा गुजरात, सौराष्ट्र, राज्यस्थान आणि काही काळापर्यंत मगधापर्यंत पसरले होते. तर दक्षिणेस कावेरीपर्यंत त्यांची सत्ता होती. हा सारा इतिहास दुर्लक्षित आहे .

या महान  साम्राज्याचा पहिल्या दोनशे वर्षाचा काळ हा शांतता व सुबत्तेचा सुवर्णकाळ होता. भौतिकशास्त्रबरोबरच विद्या व कला यांच्या उत्कर्षाचा आलेख ही या काळात सतत उंचावत जाताना दिसतो. त्यातही सातवाहन राजा हाल हा तर विद्या कलांचा चाहता, स्वतः रसिक व पंडित आणि विद्वानांचा आश्रयदाता म्हणून  भारताच्या इतिहासात अजरामर झाला आहे. त्याने संपादन केलेला गाथासप्तशती हा विख्यात ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिलेला आहे.आणि मुख्य म्हणजे सर्वसामान्य लोकजीवनाचे वर्णन करणारा भारतातला हा पहिलाच ग्रंथ म्हणावा लागेल. या ग्रंथात कोणत्याच राजाचा व राजघराण्याचा उदो उदो नाही. केवळ लोकजीवन आणि तेही  प्रामुख्याने ग्रामीण लोकजीवन त्यात प्रतिबिंबित झाले आहे. अन्य

कोणत्याही भारतीय भाषेत इतक्या प्राचीन कालीन लोकजीवनाचे व लोकमानसाचे वर्णन करणारा ग्रंथ निर्माण झाला नाही. यात थोडीही अतिशयोक्ती नाही.

संस्कृतचे विख्यात पंडित डॉ. कीथ गाथासप्तशती विषयी म्हणतात की,"इतक्या प्राचीन काळात या काव्यातल्याप्रमाणे सामान्य जीवनाचे खरेखुरे आणि बावनकशी दर्शन संस्कृत भाषेतील ग्रंथातही क्वचित आढळत नाही."[2]

महाराष्ट्र जनांची खरीखुरी आणि सनातन प्रकृती व प्रवृत्ती यात इतकी हुबेहूब चित्रित झाली आहे की, अगदी आजही महाराष्ट्री विशेषतः ग्रामीण जनतेच्या ठायी अशीच अकृत्रिम स्वच्छंदवृत्ती, राकट गोडवा, हिशेबी धोरणी वृत्ती आणि थोडासा अशिष्ट छिद्रानवेषी रंगेलपणा अगदी तसाच दिसून येतो."सनातनो नित्यनूतनः"या न्यायाने. खरं म्हणजे सातवाहनांचा सारा इतिहास हेच एक नितांतरम्यकाव्य आहे. अत्यंत स्फूर्तीदायक आहे. शिवाय चैतन्यांने रसरसलेला आणि अतिशय गतिमान आहे. असे डॉ.पु.ग.सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या 'महाराष्ट्र संस्कृती' या ग्रंथात सातवाहनाविषयी असे म्हटले आहे.

सातवाहनांचे मूळ स्थान कोणते याबद्दल वाद आहे. पण त्याचे आपल्याला कर्तव्य नाही. डॉ.पी. बी. बडीगेर यांनी ते महाराष्ट्रीयनच असल्याचे सिद्ध केले आहे.[3] सातवाहन राजांचे बहुतेक सर्व उपलब्ध शिलालेख महाराष्ट्री प्राकृत भाषेत आहेत. आणि शिवाय ते महाराष्ट्री असल्याची इतरही काही प्रमाणे आहेतच.

महाराष्ट्री प्राकृत भाषा म्हणजे मराठी भाषेची परंपरा आणि गाथासप्तशतीचे त्या दृष्टीने महत्त्व लक्षात येईल. मूळ भाषा प्राकृत तिच्यापासून निरनिराळ्या प्रांतात निरनिराळ्या प्राकृत भाषा निर्माण झाल्या. त्यापैकीच महाराष्ट्री प्राकृत ही महाराष्ट्राची सातवाहन कालीन भाषा होय. या महाराष्ट्री प्राकृत पासूनच पुढे अपभ्रंश भाषा निर्माण झाली. हिलाच प्रथम देश भासा म्हणत आणि पुढे मग तिचाच विकास होऊन यादवकालीन मराठी सिद्ध झाली. थोड्या अलंकारिक शब्दात सांगायचे तर गाथासप्तशती हे मराठीच्या आजीने मराठीला म्हटलेले अंगाई गीत होय.

थोडक्यात म्हणजे प्रथम महाराष्ट्रीतले साहित्य नंतर अपभ्रंश साहित्य आणि त्यानंतर यादवकालीन मराठी साहित्य अशा क्रमाने मराठी साहित्य परंपरेचा इतिहास लक्षात घ्यावा लागतो. वर उल्लेखलेल्या सातवाहनांचा प्रसिद्ध सम्राट राजा हाल याचा काळ इ.सन 21 असा साधारणपणे मानला जातो.[4] सातवाहनाविषयी कोणालाच काही माहिती नव्हती तेव्हाही त्याचे नाव मात्र संस्कृत व प्राकृत साहित्यात गाजत होते. याचे एकमेव कारण म्हणजे त्याने रचलेला गाथासप्तशती हा काव्यग्रंथ! त्याचे हे वाङ्मयीन कर्तृत्व अजरामर होऊन बसले आहे.इ.सनाच्या पहिल्या शतकात या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

विशेष महत्त्वाची आणि कौतुकाची गोष्ट म्हणजे हा ग्रंथ त्याने स्वतः रचलेला नाही. हे

सलग सबंध असे काव्य नाही ,हे मुक्तक काव्य आहे. त्याकाळी लोकांच्या विशेषता ग्रामीण जनतेच्या मुखी असलेल्या सातशे गाथांचा संग्रह आहे. म्हणूनच हे त्या काळच्या सर्व महाराष्ट्राचे काव्य असे म्हणतात. सर्व महाराष्ट्राच्या तत्कालीन जीवनाचे वास्तववादी दर्शन त्यात घडते.

गाथा हा काव्यप्रकार इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे यातील गाथा अति प्राचीन आहेत. त्यांचे रचयिते असंख्य आणि काही अपवाद सोडता ते सर्व अज्ञात आहेत. बौद्ध वाङ्मयातील जातक कथांमध्ये आलेल्या काही गाथा व बुद्धाच्या ही फार फार पूर्वीपासून जनमानसात रूढ होत्या. गुणाढयाच्या पैशाची भाषेतला प्रसिद्ध ग्रंथ बड्कहा यातल्याही गाथा अति प्राचीन आहेत. महाभारतीय युद्ध ते बुद्धकाल त्या कालखंडातला सुसंगत इतिहास अद्यापही फारसा उजेडत नाही. त्यातली ही पोकळी भरून काढण्याच्या कामी हे गाथा वाङ्मय उपयोगी पडू शकेल असे अनेक विद्वानांचे मत आहे. वररूची, काणभूती, गुणाढय याप्राचीन प्रख्यात लेखकाच्या लेखनात अशा या गाथा भरपूर आहेत.

विशेष आश्चर्याची तितकीच महत्त्वाची गोष्ट अशी की या गाथा निरनिराळ्या अनेक बोलीतून प्रथमच पैशाची भाषेत व नंतर पैशाचीतून संस्कृत भाषेत अशा यातील बहुतेक गाथांचा प्रवास झाला आहे. तीच गोष्ट काही कथा व दंतकथा ज्या आजही लोक माणसात मूळ धरून आहेत त्यांची. त्यातील काही कथा तर महाभारताचे पूर्वीपासूनच आहेत त्यांच्या रंगरूपात काही थोडा फरक पडला असला तरी मूळ बीज मात्र तसेच शाबूत आहे. असेही अनेक मान्यवर विद्वानांचे मत आहे.

आपण विचार करतो आहोत त्या गाथासप्तशती या काव्यसंग्रहातील मुख्य रस शृंगार आहे .पुरुष ,स्त्री ,मुग्धा,प्रौढा,प्रोषीतपतिका, विरहीनी नायिका[5] यांच्या भावभावना, एकनिष्ठ प्रेम अशा शृंगार रसाच्या सर्व छटा या ग्रंथात आढळून येतात. पण ठळकपणे लक्षात येणारी गोष्ट म्हणजे गाथासप्तशतीत जास्त भर हा शृंगाररसावर आहे. एकनिष्ठ प्रेम पतीवतचे प्रेम यात भरपूर ठिकाणी आढळून येते पण काही खोडसाळ लेखकांनी ज्या गाथा व्यभिचारी भावना नाहीत त्यांचाही अर्थ वाटेल तसा त्यांनी ओढून ताणून लावून त्या गाथा वैभिचारदर्शक आहेत अशा प्रकारचाच अर्थ लावला.

उदाहरण द्यावेचे तर 689 गाथा पहा शरद ऋतूतील शुभ चांदणे कांडलेल्या नव्या तांदळाप्रमाणे स्वच्छ दिसते. धान्याची समृद्धी झाल्यामुळे अशी चांदण्या रात्री गरीब सुद्धा गाणी गातो. अशा अर्थाची ही गाथा आहे त्यात निसर्गाचे वर्णन बहारीचे तर आहेच पण पण नेहमीच्या ठरीव संस्कृत उपमा टाकून कांडलेल्या नव्या तांदळाची उपमा दिल्यामुळे त्याला ग्रामीण जीवंतपणा आलेला आहे. तरी पण या गाथेत नवरा चांदण्यामुळे शेतावर गेला आहे. तेव्हा रान मोकळे आहे असा कुत्सित अर्थ टीकाकारांनी शोधून काढला आहे. आता एक सोज्वळ शृंगाराचे

उदाहरण बघू लग्नाच्या वेळी गायिका मंगल गीत गाताहेत आणि जणू त्यामध्ये होणारा पतीच्या नावाचा उल्लेख ऐकण्याकरिताच नववधूच्या अंगावर उत्सुकतेने रोमांच उभे राहिले आहेत.

केवळ शृंगारच नाही तर गाथासप्तशतीत निसर्गवर्णने, शिकारीची वर्णन, प्राण्यांची अगदी हुबेहूब शब्दचित्रे, त्यांच्या लकबी हेही आहे.[6] म्हणूनच ग्रामीण जीवनाचे खरेखुरे दर्शन त्यातून घडते. इतकी वर्षे उलटली पण आजही ग्रामीण जीवनाच्या या चित्रात काही बदल झालासा वाटत नाही. गाथासप्तशतीचे अंतरंग हे असे आहे. आणि हा काव्यकोष असा काव्यसौदर्याने भरलेला असल्यामुळे प्राचीन काळच्या पंडितांनीसुद्धा त्याचा मुक्तकंटाने गौरव केला आहे. बाणभट्ट म्हणतो “एखाद्या राजाने उत्तम रत्नांचा संग्रह करावा तसा सातवाहन राजाने हा सुभाषितांचा कोश रचला आहे.”

आचार्य उद्योतूनसुरी यांनी आपल्या या ग्रंथात म्हटले की, “राज्यसभेतील कवींच्या सहकार्याने हाल राजांनी असा हा अक्षय कोश रचला की निरंतर उपयोगाने सुद्धा त्याचे सौंदर्य लोपले नाही.”

सुप्रसिद्ध कवी राजशेखर यांनीही गाथासप्तशतीचा असाच गौरव केला आहे. तो म्हणतो सातवाहन राजाने अनेक ठिकाणहून गाथा संकलित करून त्याचा संग्रह केला. त्यामुळे लोकांचा आनंद द्विगुणीत झाला. अजून एक महत्त्वाची गोष्ट संस्कृत साहित्यातील अनेक विख्यात पंडितांनी मौलिक असे ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील आनंदवर्धन, धनंजय,मम्मट, विश्वनाथ यासारख्या दिग्गज सुद्धा गाथासप्तशतीतील अलंकाराची उदाहरणे आपल्या ग्रंथात घेतलेली आहेत. यावरूनच हे अलंकार किती मान्यता पावले होते हे लक्षात येईल. निदान 12 - 13 साहित्यशास्त्रज्ञांनी अशा गाथांची उदाहरणे आपल्या ग्रंथात दिली आहेत. जाता जाता आणखी एक बाबींचा उल्लेख केला पाहिजे मान्यता पावलेल्या इतर अनेक प्राचीन लोकप्रिय ग्रंथाप्रमाणे या गाथासप्तशती ग्रंथात नंतरच्या काळात ही काही भर पडली आहे.

सातवाहन राजा हाल व गाथासप्तशती यांचे अतूट नाते आणि हालाचे अलौकिक कार्य याचा महाराष्ट्राला कधीच विसर पडणार नाही. सातवाहन राजा हालाचे मला मोठे कौतुक वाटते. त्याच्याबद्दल अतिशय आदर वाटतो, सातवाहन कुळ अवघ्या भारतातले प्रचंड शक्तिशाली असे सम्राट होते. काव्यच करावयाचे तर हाल राजाला आपल्या कुलाची दिगंत कीर्ती सांगणारे काव्य रचता आले असते. स्वतः हाल राजाही वैभवाच्या व सामर्थ्याच्या शिखरावर होता. स्वतःची महत्ता सांगणारे लेखनही हा राजा करू शकला असता.अशी उदाहरणे भारताच्या व जगाच्या इतिहासात ही भरपूर आहेत. पण या थोर राजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, असे काही न करता ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे त्यावेळच्या समाज जीवनाच्या आत्म्याचे साक्षात दर्शन घडवणारे आणि प्राचीन इतिहासाच्या संबंधी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या अशा या गाथांचे

संपादन त्यांनी केले. हे खरे बावनकशी कशी रसिकत्व हा खरा मनाचा मोठेपणा आणि हाच खराखुरा सुसंस्कृतपणा. जगाच्या इतिहासात अशी उदाहरणे अपवादात्मकच, यामुळेच या हाल सातवाहन राजाचे नाव इतिहासात अजरामर झाले. मराठी वाङ्मयावर आणि एक प्रकारे भारताच्या इतिहासावर त्याचे न फिटण्याएवढे ऋण आहेत, हे कोणीही नाकार नाहीअसे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ**

1. स. आ. जोगळेकर- हाल सातवाहनाची गाहासत्तसई पद्मगंधा प्रकाशन पुणे, 2012
2. मंगरूळकर/ हातवळणे- गाहासत्तसई, देशमुख प्रकाशन पुणे, 1958
3. आचार्य हरिराम- महाकवी हाल और गाहासत्तसई, प्रकाशन स्कीम जयपुर, 1982
4. बडे/मंगरूळकर-शेफालिका, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, 1984
5. सौ.मंगल साबळे- गाहासत्तसई, महालक्ष्मी प्रकाशन सांगली, 1995
6. डॉ. पी. बी. बडीगिर -गाहासत्तसई, अभिनंदन प्रकाशन म्हैसूर, 1988